!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे
## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प २००/१२/०३/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# राष्ट्रीय औषधनिर्माण शिक्षण व संशोधन संस्था संभाजीनगरात स्थापन करा : खासदार चंद्रकांत खैरे

### लोकसभा अध्यक्षा सुमित्रादेवी महाजन यांच्याकडे आग्रही मागणी

**संभाजीनगर : ( ता. १८ )** केंद्रिय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी केंद्रिय अर्थसंकल्पात देशात तीन राष्ट्रीय औषधी निर्माण शिक्षण व संशोधन संस्था उभारण्याची घोषणा केली आहे. या घोषणेचे स्वागत करुन देशातील तीन पैकी एक संस्था संभाजीनगरात स्थापन करण्याची मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभा अध्यक्षा सुमित्रादेवी महाजन यांच्याकडे शुन्यप्रहारात काळात केली.

संभाजीनगरात लुपीन, वोखार्ड, अंजिठा फॉर्मास्युटिकल यासारख्या औषधी कंपन्या कार्यरत आहेत. याचबरोबर मसिआ (चेंम्बर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज एंड अॅग्रीकल्चर) यांनी ही संस्था संभाजीनगरात स्थावावी अशी इच्छ आहे. बहुतांश वैद्यकिय क्षेत्रातील व औषधनिर्माण क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा फायदा निश्चित होऊन स्थानिक रोजगार वाढवण्यास मदत होईल.

आशिया खंडातील सर्वात वेगोन वाढणारे शहर व दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडोर सारखे प्रकल्पांसाठी केंद्राने भरघोष मदतीची घोषणा केली आहे. नॅशनल इंस्टीट्युट ऑफ फॉर्मा स्टुटिकल एज्युकेशन एंड रिचर्स (एनआयपीईआर) सारख्या संस्था स्थापन होण्यासाठी पायाभुत सुविधा, जमीन, मुबलक गोष्टीची कमतरता भासणार नाही. असेही शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन यांच्याकडे मागणी केली.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400